**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. ४७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. अंकुश सिताराम गायकवाड,<br>२३२/७, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ,<br>सोलापूर. | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>सोलापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर विभागीय कार्यालय, सोलापूर.<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>सं व सु अ उप विभागीय कार्यालय, सोलापूर. | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. अंकुशराव सिताराम गायकवाड, ३२७/७, जुनी मिल आवार, मुरारजी पेठ, सोलापूर यांनी दि. १९.१.२००८ पासून महावितरणकडून घरासाठी तात्पुरता विद्युत पुरवठा घेतलेला आहे. उमा गृहनिर्माण संस्था या संस्थेचे सभासद असून अद्यापपर्यंत संस्थेकडून लाईट कनेक्शनचे काम झालेले नाही. महावितरणकडून घेतलेले तात्पुरते कनेक्शन कायमस्वरुपी मिळण्याबाबतचा अर्ज त्यांनी दि. २९.९.२००८ रोजी कागदपत्रांसह दिलेला आहे. परंतु त्यांना महावितरणकडून कांही कळविण्यात आलेले नाही.

कनेक्शन कायमस्वरुपी घरगुती करुन मिळावे तसेच दि. २९.९.२००८ पसून वसूल केलेल्या जादा रकमेचा परतावा द्यावा अशी क्ष फॉर्ममध्ये तक्रार दि. ३०.११.२००९ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांचेकडे केला होता. तक्रार अर्जाची सुनावणी कक्षाने दि. १३.१.२०१० रोजी घेवून निर्णय दिला. तो मान्य नसल्याने तक्रारदाराने दि. २.३.२०१० रोजी अ फॉर्ममध्ये मंचाकडे अपील दाखल केले.

दि. २०.४.२०१० रोजी मंचासमोर सुनावणी झाली असतां तक्रारदार हजर होते. वि.प.तर्फे श्री. थोरात, नोडल ऑफीसर, श्री. कोलप, कार्यकारी अभियंता (शहर) सोलापूर हे हजर होते. वि.प.तर्फे असे सांगण्यात आले की, तक्रारदारास दि. १९.१.२००८ रोजी त्यांच्या अर्जाप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात विद्युत पुरवठा करणेत आला असून जानेवारी २००८ ते मे २००८ या कालावधीचे वीज वापराचे बील घरगुती दर संकेतानुसार देण्यात आलेले आहे. संगणकास माहिती भरतांना तात्पुरत्या वीज पुरवठ्याच्या संकेताऐवजी घरगुती दरसंकेत चुकून भरला गेला होता. ते दुरुस्त करुन L.T. VII टॅरिफ प्रमाणे आकारणी करण्यात आली.

तसेच उमा सहकारी गृह निर्माण संस्थेने ओआरसी स्कीममध्ये काम स्वत: करणेसाठीची सुपरवीजन चार्जेससाठी १.३ टक्के रक्कम दि. २५.७.२००७ रोजी भरली असून ते काम पूर्ण झाल्यानंतर व संस्थेच्या जागेवरील अद्यावत थकबाकी (रु. ९.०५ लाख जानेवारी २००८ पर्यंत) भरलेनंतर कायमस्वरुपी विद्युत पुरवठा करणेत येईल असे सांगितले. दि. २९.९.२००८ रोजी कायमस्वरुपी कनेक्शनसाठी तक्रारदाराने अर्ज दिल्याचे वि.प.यांनी मान्य केले.

मुळ तक्रार मागणी अर्ज त्यावरील वि.प.ची भूमिका व दाखल केलेली कागदपत्रे, अंतर्गत कक्ष, सोलापूर यांचा निर्णय, सुनावणी दरम्यानची कथने यांचा एकत्रित विचार करतां, खालील मुद्दे निष्कर्षाप्रत उद्‌भवतात.

प्रश्न क्र. १ : तक्रारदारास तात्पुरते वीज कनेक्शन जागेवर थकबाकी असतांना दिले आहे काय ?
उत्तर : होय
प्रश्न क्र. २ : सदर कनेक्शन घरगुती कारणासाठी दिलेले आहे काय ?
उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तक्रारदाराच्या मागणीनुसार घरगुती टेरीफ प्रमाणे वीज आकारणी करणे योग्य होईल काय ?
उत्तर : होय
प्रश्न क्र. ४ : आदेश ?
उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदाराची कन्स्ट्रक्शन ॲक्टीव्हीटी संपलेली असून घरगुती कारणासाठी टेम्परररी कनेक्शनचा वापर चालू आहे. त्याचा सरासरी वापर हा सरासरी १०० युनिटपेक्षाही कमी असल्याचे जोडलेल्या बिलावरुन दिसून येते. महावितरणची प्रचलित टेरीफ ऑर्डर प्रमाणे L.T. VII नुसार वीज आकारणी करणे संयुक्तिक वाटत नाही. तात्पुरते कनेक्शन कोणकोणत्या कारणासाठी देता येते व वीज आकारणी कशी लागू होते ते कमर्शियल सर्क्यूलर नं. ८८ व १०२ नुसार स्वयंस्पष्ट आहे.

दि. ४.९.२०१० रोजी सोलापूर मंडल कार्यालयामध्ये इतर केसेसच्या सुनावणीच्या वेळीस सदर केसबाबत फेर खुलासा देण्यास सांगितले. त्याप्रमाणे नोडल ऑफीसरने त्यांचे पत्र क्र. ७९११ दि. १९.१०.२०१० ने खुलासा पाठविला. त्यामधील मुद्दा क्र. ( ४ ) च्या शेवटी, ग्राहकाने कायमस्वरुपी घरगुती वीज पुरवठा करण्यासाठी दिलेल्या अर्जाच्या तारखेपासून घरगुती दरासाठी संमत्ती दिलेली आहे. तसेच उमा सहकारी गृह निर्माण संस्थेच्या जागेवरील थकबाकीबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही.

## आदेश

१) तक्रारदारास दि. २९.९.२००८ पासून म्हणजे अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून घरगुती दराप्रमाणे वीज आकारणी करावी.

२) दि. २९.९.२००८ पासून आदेशाच्या तारखेपर्यंतचा वसूल केलेल्या जादा रकमेचा परतावा येणाऱ्या पुढील ३ बिलींग सायकलमध्ये समायोजित करावा.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :